पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ७

**सभावृत्तांत**

दिनांक - **०४/१०/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०४/१०/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा.तापकीर विनया प्रदीप(आबा)
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
८. मा.काळे उषा दिलीप
९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.बाराथे – लेखाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.६) शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये ग्रीन बोर्ड ची आवश्यकता असलेने विद्यार्थी आरोग्य या लेखाशिर्षावरील रक्कम वर्ग करणेबाबत - मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक व माध्यमिक शाळानिहाय सायन्स सेंटर स्थापन करणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) सेवा वर्गीकरणाबाबत - मा.शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.शर्मिला बाबर अनुमोदक – मा.अश्विनी चिंचवडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता जीवन गायकवाड यांचे दिनांक - ०३/१०/२०१८ रोजी दुखःनिधन झालेले असून सभागृहात त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी २ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली. )

----------

(मा.श्रीमती पाटील, उपपोलीस आयुक्त यांचा सभेत मा. सभापती यांचे हस्ते पुस्तक देवून सत्कार करण्यात आला. मा. सभापती यांचे परवानगीने विद्यार्थीनी व महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांचे समवेत चर्चा करण्यात आली.)

----------

दिनांक **२१/०९/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक – ०१

दिनांक - ०४/१०/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शिक्षण आस्था/१/अ/७८/२०१८, दि.२४/०९/२०१८

विषय – अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ०४/१०/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा. शारदा सोनवणे अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१/कावि/७५७/२०१८, दि.२७/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कै.भिकोबा सोपान भुजबळ प्राथमिक शाळा माळवाडी, पुनावळे क्र.१०५ यांचे मार्फत १०० टक्के वाचन व लेखन विकास कार्यक्रम राबविणेत आला आहे. मुख्याध्यापक यांनी अप्रगत विद्यार्थी, अन्य भाषीक विद्यार्थी, विषयनिहाय व स्तरनिहाय विद्यार्थी, यांची माहीती संकलीत करुन प्रमाणात गट तयार १०० टक्के वाचन लेखन विकास कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले

त्यामूळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता दर्जा सुधारणा झाल्याचे निदर्शनास आले असल्याने १०० टक्के वाचन लेखन विकास कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ | विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०४/१०/२०१८ | विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा.शर्मिला बाबर | अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१/कावि/७५६/२०१८, दि.२७/०९/२०१८

विषय – शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय वाचनाबाबत..

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ | विषय क्रमांक – ०४

दिनांक - ०४/१०/२०१८ | विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा. शारदा सोनवणे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शिक्षण/सशिअ/३३१/२०१८, दि.२७/०९/२०१८

विषय- समग्र शिक्षा अभियान अंतर्गत गट/शहर साधन केंद्रातील साधन व्यक्ती यांच्या कामकाज अहवाल वाचन करण्याबाबत..

विषय क्रमांक ०४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७ | विषय क्रमांक – ०५

दिनांक - ०४/१०/२०१८ | विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा. शारदा सोनवणे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र
जा.क्र.शिक्षण/प्रशा/५/कावि/५२६/२०१८,दि.२८/०९/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता तसेच शिलसंवर्धन, आरोग्य, हस्तव्यवसाय, स्वावलंबन या शिक्षणातून मुलांवर बालपणात सुसंस्कार करून त्यांच्या व्यक्तीमत्वाला योग्य आकार आणि दिशा देऊन शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर आदर्श नागरिक घडविणा-या स्काऊट/गाईड या विषयांचा कार्यानुभव विषयांतर्गत समावेश करण्यात आला आहे. संबधित विषयाला आठवड्यातून दोन तासिका देण्यात आल्या आहेत. त्या दृष्टीने बनी टमटोल/कब बुलबुल/स्काऊट गाईड पथक नोंदणी व सामान्य माहिती वर्गाचे आयोजन करणे. पुणे भारत स्काऊट गाईड जिल्हा संस्था, पुणे यांचे दिनांक १९/०७/२०१८ चे मनपा प्राथमिक शाळा/खाजगी प्राथमिक शाळांमधील बनी टमटोल/कब बुलबुल/स्काऊट गाईड या कार्यशाळेचे आयोजन करण्याकरिता शिक्षण विभागाचे अंदाजपत्रकात र.रु.५,००,०००/- तरतूद करणेत आली

आहे. सदर कार्यशाळेसाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे नोंदणीशुल्क आकारणी आवश्यक आहे. परंतु या बाबत आकडेवाडी निश्चित नसल्याने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक – ०६

दिनांक - ०४/१०/२०१८

सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे ,मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये सध्या मा.महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, तसेच शिक्षण समिती सदस्य, मा.प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग यांचे शाळा पाहणीदौरा चालू आहे. तरी सदर शाळा पहाणी दौरा मध्ये मनपाशाळांमध्ये ग्रीनबोर्डची आवश्यकता असलेचे दिसून आले आहे. तसेच याबाबत काही पालकांनी देखील याबाबत विचारणा केली आहे. तरी याबाबत विद्यार्थ्यासाठी ग्रीनबोर्ड खरेदी करणेकामी विचारणा केली असता सदरची खरेदी करणेकामी तरतूद र.रु.१५,००,०००/- इतकी अपूरी असल्याचे समजते आहे. तरी याबाबत शिक्षण विभागाकडील अंदाजपत्रक सन २०१८-१९ मधील **विद्यार्थी आरोग्य** या लेखाशिर्षावरील र.रु.२० लाख इतकी तरतूद वर्ग केल्यास सदरचे काम होणार असल्याने सदर रक्कम वर्गीकरण करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल – ०५ प्रतिकुल – ०४

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक – ०७

दिनांक - ०४/१०/२०१८

सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे ,मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

शिक्षण समिती सभा ठराव क्र.१८ दिनांक १०/०८/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये सायन्स सेंटर कायम स्वरुपी स्थापनेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन माध्यमिक शाळांमध्येही सायन्स सेंटर कायम स्वरुपी स्थापनेस मान्यता देणेत येत आहे. हा प्रकल्प महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शाळानिहाय स्थापना करण्यासाठी आवश्यक त्या बाबींची महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विभागाने पूर्तता करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सायन्स सेंटर प्रकल्पासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चाची तरतूद प्राथमिक शिक्षण विभागातील ई-लर्निंग स्कूल (पान क्र.२९९ वरील अ.नु.क्र.४९) या लेखाशिर्षामधून खर्च करण्यात यावा. सदर लेखाशिर्षावर सायन्स सेंटरसाठी सन २०१८-१९ या वर्षात लागणा-या जादा खर्चासाठी प्राधान्याने ई-लर्निंग स्कूल (पान क्र.२९९ वरील अनु.क्र.४९) या लेखाशिर्षावर प्राथमिक व माध्यमिक विभाग व इतर विभागातील उपलब्ध अखर्चीत राहिलेली तरतूद तसेच इतर विभागास न लागणारी तरतूद रक्कम वर्गीकरण करणेस व याकामी येणा-या

प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

अनुकुल – ०५ प्रतिकुल – ०४

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक – ०८

दिनांक - ०४/१०/२०१८

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.सुवर्णा बुर्डे संदर्भ :- मा. शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाकडे सेवा वर्गीकरण करणेकामी ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.२९/०६/२०१७ नंतर पती - पत्नी एकत्रीकरण एकतर्फी बदली सेवा वर्गीकरणानुसार प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन कामकाज सुरु करणेस व दि.२९/०६/२०१७ पूर्वी प्राप्त झालेले अर्ज व प्रस्ताव निरस्त करणेकामी व तसे निर्णय घेवून संबंधितांना कळविणेस मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार दि.२९/०६/२०१७ नंतर छाननीमध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार शिक्षकांच्या पती - पत्नी एकत्रीकरण व एकतर्फी बदली सेवा वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकुल – ०५ प्रतिकुल – ०४

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६६१/२०१८
दिनांक : ०५/१०/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.